राज्यातील शासकीय/अशासकीय अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बी.एड अभ्यासक्रमांच्या शुल्कात सुधारणा करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## शासन निर्णय क्रमांकः बीएड-४६१५/प्र.क्र.१२४/१५/मशि-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: १९ सप्टेंबर, २०१६.

वाचा :

१) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.एसीटीसी-१०००/(१२२/२०००)/मशि-३, दिनांक २९ डिसेंबर, २०००.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.एनजीसी-२००१/बी.एड./(४४२/०१)/मशि-३, दिनांक २४ मे, २००२.
३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.बीएड-४६१५/प्र.क्र.१२४/१५/मशि-२, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१५.
४) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/२०१५-१६/शिक्षण शुल्क/प्र.क्र.१२४/बी.एड, दिनांक २१.३.२०१६.

प्रस्तावना :

राज्यातील शासकीय व अशासकीय अनुदानित अध्यापक महाविद्यालयातील बी.एड अभ्यासक्रमाच्या शिक्षण शुल्काचे दर संदर्भ क्र.२ येथील दिनांक २४ मे, २००२ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आले आहेत. त्यानुसार राज्यातील शासकीय व अशासकीय अनुदानित अध्यापक महाविद्यालयातील बी.एड अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क प्रतीवर्षी मागील वर्षीच्या शुल्कामध्ये ५% इतकी वाढ करुन सन २००६-०७ पर्यंत पाच वर्षाच्या कालावधीसाठी निश्चित करण्यात आले होते. त्यानंतर सदर शुल्काचे पुनर्विलोकन करण्यात आलेले नाही वा सुधारित शुल्कास मंजूरी देण्यात आलेली नाही. त्यामुळे अद्यापपर्यंत प्रत्येक वर्षी ५% वाढ करुन शासकीय/अशासकीय अनुदानित अध्यापक महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क संचालक, उच्च शिक्षण यांचेकडून निश्चित करण्यात येते. सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षासाठी बी.एड अभ्यासक्रम २ वर्षाचा झाला असल्याने सदर शुल्क २ वर्षामध्ये विभागून रु.९,४२८/- प्रतिवर्ष असे प्रस्तावित करण्यात आले होते. दिनांक ६.७.२०१५ रोजीच्या बी.एड प्रवेश नियमावलीच्या शासन निर्णयान्वये रु.९,४२८/- प्रतिवर्ष एवढे अंतरिम शुल्क सन २०१५-१६ आणि २०१६-१७ साठी निश्चित करण्यात आले आहे. सदर शुल्कामध्ये वाढ करण्याकरिता संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या समितीच्या शिफारसी विचारात घेऊन, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी संदर्भ क्र.४ येथील पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने

शासकीय/अशासकीय अनुदानित अध्यापक महाविद्यालयांतील बी.एड अभ्यासक्रमाच्या शुल्कामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

शैक्षणिक वर्ष सन २०१६-१७ पासून राज्यातील शासकीय व अशासकीय अनुदानित अध्यापक महाविद्यालयातील द्विवर्षीय बी.एड अभ्यासक्रमाच्या शिक्षण शुल्काच्या दरात सुधारणा करुन खालील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे सुधारीत शुल्क आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(१) शिक्षण शुल्क :-

| | |
|---|---|
| दोन वर्षाकरिता | : रु.२०,७४०/- |
| प्रथम वर्ष | : रु.१०,३७०/- |
| द्वितीय वर्ष | : रु.१०,३७०/- |

(२) इतर शुल्क :-

(अ) प्रथम वर्ष:-

| खुला प्रवर्ग | | | मागास प्रवर्ग | |
|---|---|---|---|---|
| १ | प्रवेश शुल्क | रु.१००/- | प्रवेश शुल्क | --- |
| २ | ग्रंथालय शुल्क | रु.१०००/- | ग्रंथालय शुल्क | रु.१०००/- |
| ३ | जिमखाना शुल्क | रु.१०००/- | जिमखाना शुल्क | रु.१०००/- |
| ४ | प्रयोगशाळा शुल्क | रु.१०००/- | प्रयोगशाळा शुल्क | रु.१०००/- |
| ५ | उपक्रम शुल्क | रु.३०००/- | उपक्रम शुल्क | रु.३०००/- |
| एकूण | | रु.६१००/- | एकूण | रु.६०००/- |

(ब) द्वितीय वर्ष :-

| खुला प्रवर्ग | | | मागास प्रवर्ग | |
|---|---|---|---|---|
| १ | प्रवेश शुल्क | --- | प्रवेश शुल्क | --- |
| २ | ग्रंथालय शुल्क | रु.५००/- | ग्रंथालय शुल्क | रु.५००/- |
| ३ | जिमखाना शुल्क | रु.५००/- | जिमखाना शुल्क | रु.५००/- |
| ४ | प्रयोगशाळा शुल्क | रु.५००/- | प्रयोगशाळा शुल्क | रु.५००/- |
| ५ | उपक्रम शुल्क | रु.२०००/- | उपक्रम शुल्क | रु.२०००/- |
| एकूण | | रु.३५००/- | एकूण | रु.३५००/- |

२. तसेच, शासकीय व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील बी.एड अभ्यासक्रमाचे शुल्क शासनाकडून पुनःश्च निर्धारित होईपर्यंतच्या कालावधीकरिता दरवर्षी अंतरिम वाढ म्हणून ५% प्रमाणे शिक्षण शुल्कात वाढ करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

३. शैक्षणिक वर्ष सन २०१५-१६ मध्ये शासकीय/अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील बी.एड अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांकडून अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षामध्ये (सन २०१६-१७) सुधारित शिक्षण शुल्क व इतर शुल्क आकारण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०९१९१५३८१४६५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Urmila Vaibhav Joshi

Digitally signed by Urmila Vaibhav Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Urmila Vaibhav Joshi
Date: 2016.09.19 15:41:48 +05'30'

(उर्मिला जोशी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. संचालक, उच्च शिक्षण, महराष्ट्र राज्य, पुणे,
२. सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण,
३. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे,
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
५. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
८. सर्व प्राचार्य, शासकीय/अशासकीय अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालये (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत)
९. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
१०. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
११. प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
१२. उप सचिव (म.शि.) यांचे स्वीय सहाय्यक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. निवडनस्ती- कार्यासन मशि-२.